# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Washim District**

**Date of Good Work done** :- **22/12/2022**

**Brief of the work done :-**

'महिला_तक्रार_निवारण_कक्ष'ने फुलविले 78 कुटुंबियांच्या चेहऱ्यावर हसू.

लोकमत

# ७८ संसारात पुन्हा फुलले हास्य

## समुपदेशनातून मनोमिलन : वर्षभरात ३३५ तक्रारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम** : किरकोळ कारणांवरून पती-पत्नीत भांडण, तंटे होऊन अनेकांचा संसार उद्ध्वस्त होत असल्याचे वास्तव आहे. अशा संसाराला जोडण्याचे काम पोलीस अधीक्षक कार्यालयातील महिला तक्रार निवारण केंद्रातून चालत आहे. मागील वर्षभरात तुटण्याच्या मार्गावर असलेले ७८ जोडप्यांचे संसार पुन्हा नव्याने जोडण्यात आले.

गैरसमज, व्यक्तिगत व किरकोळ कारणांवरून होणारी कुरबूर होऊन घटस्फोट घेण्यापर्यंत प्रकरण जाते, तर काहींना न्यायालयात जावे लागते. यामुळे नवरा-बायको यांच्यासह संपूर्ण कुटुंबाला मानसिक, आर्थिक त्रास सहन करावा लागतो. लहान-मोठ्या कारणांमधून निर्माण झालेले गैरसमज केवळ सुसंवादाच्या अभावाने वाढत जातात. विस्कटण्याच्या मार्गावर असलेले संसार पुन्हा जोडण्यासाठी पोलिस अधीक्षक कार्यालयात महिला तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली. याशिवाय महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी जिल्ह्यातील सहा तालुक्यांत पोलिस स्टेशन स्तरावर महिला मदत कक्ष, महिला दक्षता समिती, निर्भया पथक, विशेष बाल पोलिस पथक कार्यान्वित करण्यात आले आहेत.

विविध कारणांमुळे कौटुंबिक वादाच्या तक्रारी पोलिस स्टेशन स्तरावर, जिल्हा स्तरावर स्थापन असलेल्या महिला तक्रार निवारण कक्ष येथे तडजोड व समुपदेशनासाठी प्राप्त होत आहेत. वाशिम येथील महिला तक्रार निवारण कक्षात जानेवारी ते नोव्हेंबर २०२२ मध्ये महिलांच्या कौटुंबिक वादाच्या एकूण ३३५ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी ७८ कुटुंबांचे मोडकळीस आलेले संसार पुन्हा फुलविण्यात महिला तक्रार निवारण कक्षास यश आले. अन्य तक्रारींमध्ये सुद्धा समुपदेशन केले जाते. पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनात महिला तक्रार निवारण कक्ष येथे समुपदेशन करून जास्तीत जास्त कुटुंबांचे संसार सुरळीत करण्यात येत आहेत.



### तडजोड न झाल्याने ५९ प्रकरणांत गुन्हा दाखल

महिला तक्रार निवारण कक्षात जानेवारी ते नोव्हेंबरदरम्यान प्राप्त ३३५ तक्रारींपैकी आपसात कोणत्याही प्रकारची तडजोड न झाल्याने ५९ तक्रारींमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून, १३ तक्रारींमध्ये परस्पर फारकत, १८ तक्रारी फाईल करण्यात आल्या.

### सुसंवाद वाढवा, वाद थांबवा

किरकोळ कारणावरुन पतीपत्नीत वाद होत असल्याचे समोर येत आहे. या वादाचा परिणाम थेट पाल्याच्या भवितव्यावरही होतो. त्यामुळे पतीपत्नीने सुसंवाद वाढवावा, गैरसमज दूर करावे आणि संसाराची गाडी सुरळीत चालवावी असा सल्ला दिला.